१०९३/-

प्रपत्र-ब

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २१/०३/२०२२ ते २९/०७/२०२२ या कालावधीमध्ये झालेल्या बैठकीतील इतिवृत्तानुसार प्राधिकरण कार्यालयाद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीचा (Action Taken Report) अहवाल खालीलप्रमाणे,-

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १. | २१/०३/२०२२ ते २९/०७/२०२२ | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक पदवी/ पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे<br><br>(J. P. Dange)<br>Chairman<br>Admissions Regulating Authority,<br>Maharashtra State | दिनांक २१/०३/२०२२ ते २४/०६/२०२२ या कालावधीमध्ये प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या झालेल्या बैठकींचे इतिवृत्त प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. प्राधिकरणाचे सर्व सदस्य व संबंधीत संचालक आणि सीईटी कक्षास ईमेलद्वारे अवगत करण्यात आलेले आहे. मा. अध्यक्ष, प्रनिप्रा यांच्या निर्देशानुसार दिनांक २८/०७/२०२२ व २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त संकेतसथळावर प्रसिध्द न करता, प्राधिकरणाचे सर्व सदस्यांना ईमेलद्वारे अवगत करण्यात आले आहे.<br><br>तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या मान्यते नुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची अभ्यासक्रम व महाविद्यालय - निहाय पत्रे संबंधीत महाविद्यालयांना ईमेलद्वारे अवगत करण्यात आलेली आहेत. तसेच मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार प्रवेश मान्यता पत्रे संबंधीत महाविद्यालये, विद्यापीठे व इतर संबंधीत विभांगाना स्पीड-पोस्टद्वारे पाठविण्यात येत आहे.<br><br>आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या खालील महाविद्यालयांच्या प्रवेशित प्रकरणी सीईटी कक्षाकडून मिळालेल्या माहितीमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी सीईटी कक्षांकडे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता नोंदणी केलेली नाही अथवा सीईटी कक्षाच्या Feedback Module मध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची नोंद करण्यात आलेली नाही, अशा विद्यार्थ्यांचा तपशील प्राधिकरणाच्या प्रवेश |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक</th><th>बैठकीतील निर्देश</th><th>करण्यात आलेली कार्यवाही</th></tr>
<tr><td></td><td>(J. P. Dange)<br>Chairman<br>Admissions Regulating Authority,<br>Maharashtra State</td><td></td><td>मान्यतेच्या पोर्टलवर उपलब्ध नाही, तथापि, संबंधीत संचालनालयाने सादर केलेला अहवालामध्ये अशा विद्यार्थ्यांची नोंद घेण्यात आली असल्याने, प्रवेशित विद्यार्थी संख्या यामध्ये तफावत आढळुन येत आहे, तसेच संबंधीत प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही. सदरील महाविद्यालयांचा तपशील खालीलप्रमाणे आहे,-
<table>
<tr><th>Sr. No.</th><th>Name of the College</th><th>Course</th></tr>
<tr><td>1.</td><td>Vedanta Inst. of Medical Sciences, Palghar</td><td>MBBS</td></tr>
<tr><td>2.</td><td>SMBT Dental College, Sangamner, Ahmednagar</td><td>BDS</td></tr>
<tr><td>3.</td><td>SMBT Dental College, Nashik</td><td>BDS</td></tr>
<tr><td>4.</td><td>Terna Charitable Trust College of Physiotherapy, Thane (06118)</td><td>B.P.Th.</td></tr>
<tr><td>5.</td><td>Rashtrasant Janardan Swami College of Physiotherapy, Kopargaon, Ahmednagar (06148)</td><td>B.P.Th.</td></tr>
<tr><td>6.</td><td>Sai Care College of Physiotherapy, Dindori, Nashik (6158)</td><td>B.P.Th.</td></tr>
<tr><td>7.</td><td>Healing Hand Physiotherapy, Nagpur (6254)</td><td>B.P.Th.</td></tr>
</table>
सबब वरील महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती प्राधिकरणाच्या पोर्टलवर अद्यावत करुन सुधारीत प्रवेश मान्यता पत्र मा. अध्यक्ष, प्रनिप्रा यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येतील.<br><br>
B.Pharmacy या अभ्यासक्रमामधील फार्म.डी. व फार्म.डी. (पी.बी.) अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचा Data एकत्रित आहे. सदरचा Data अभ्यासक्रमनिहाय उपलब्ध झाल्यानंतर ०७ महाविद्यालयांना प्रवेश मान्यता पत्रे मा. अध्यक्ष, प्रनिप्रा यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येतील.<br>
M.Pharm, MBA व MCA या अभ्यासक्रमाच्या ०५ महाविद्यालयांच्या Data पोर्टलवर अद्यावत करुन सुधारीत प्रवेश मान्यता पत्रे मा. अध्यक्ष, प्रनिप्रा यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येतील.</td></tr>
<tr><td>२.</td><td>७/४/२०२२ विषय सूची क्रमांक २(ख)</td><td>प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही विभागातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या</td><td>प्राधिकरणाच्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही विभागातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये ५% दराने वेतन वाढ</td></tr>
</table>

90951-

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | वेतनवाढीबाबत | करण्यात आली असून ११ महिन्यांकरिता नियुक्तीस मुदतवाढ देण्यात आलेली आहे. |
| ३. | ११/४/२०२२ विषय सूची क्रमांक १(५) | संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या तपासणी अहवालात काही विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेसाठी शिफारस केली नव्हती, परंतू त्रुटी दर्शविण्यात आली नाही व काही विद्यार्थ्यांचे प्रवेश मान्यतेसाठी शिफारस होती. परंतू त्यांच्या नावासमोर प्रवेश रद्द असा शेरा होता (प्रपत्र -ई) असे सर्व प्रवेश १% प्रवेश पडताळणी समितीने पुन:श्च पडताळणी करुन त्याचा अहवाल त्वरीत प्राधिकरणास सादर करावा. तद्नंतर या प्रवेशाबाबत मान्यतेचा उचित निर्णय घेण्यात येईल. | उपसमितीच्या पडताळणी अहवालास प्राधिकरणाच्या दि.२९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. सदर अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने संबंधीत महाविद्यालयांना मान्यता पत्रे निर्गमित करण्यात आलेली आहेत. |
| ४. | १२/०४/२०२२ विषय सूची क्रमांक १(३) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील Pharm-D (PB).या अभ्यासक्रमाच्या प्रवेश मान्यता प्रकरणी. | दिनांक २२/०४/२०२२ रोजीच्या ई-मेलद्वारे संबंधितांना प्रक्रिया शुल्क भरण्याबाबत अवगत करण्यात आले. |
| ५. | १२/०४/२०२२ विषय सूची क्रमांक १(४) | पुणे इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, पुणे (६६४१) - येथील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी | दिनांक १८/१०/२०२२ रोजीच्या ई-मेलद्वारे सदर प्राधिकरणाचा निर्णय अवगत करण्यात आला. सदर महाविद्यालयाने अद्याप दंडाच्या रकमेची प्रतिपुर्तता केलेली नाही. |
| ६. | १२/४/२०२२ विषय सूची क्रमांक १(६) | संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या तपासणी अहवालात काही विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेसाठी शिफारस केली नव्हती, परंतू त्रुटी दर्शविण्यात आली नाही व काही विद्यार्थ्यांचे प्रवेश मान्यतेसाठी शिफारस होती. परंतू त्यांच्या नावासमोर प्रवेश रद्द असा शेरा होता (प्रपत्र -ड) असे सर्व प्रवेश १% प्रवेश पडताळणी समितीने पुन:श्च पडताळणी करुन त्याचा अहवाल त्वरीत प्राधिकरणास सादर करावा. तद्नंतर या प्रवेशाबाबत मान्यतेचा उचित निर्णय घेण्यात येईल. | उपसमितीच्या पडताळणी अहवालास प्राधिकरणाच्या दि.२९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. सदर अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने संबंधीत महाविद्यालयांना मान्यता पत्रे निर्गमित करण्यात आलेली आहेत.<br><br>(J. P. Dange)<br>Chairman<br>Admissions Regulating Authority,<br>Maharashtra State |

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ७. | १३/४/२०२२ विषय सूची क्रमांक १(३) | श्री. साई सामाजिक विकास संस्था संचलित, श्री साई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, परदरी, ता. - जिल्हा : औरंगाबाद (संकेतांक क्रमांक २१४१) या संस्थेचा तपासणी अहवाल संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी ऑफलाईन तपासून सादर केला आहे. या संस्थेमध्ये एकुण १०७ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले आहेत. या संस्थेची संलग्नता डॉ. बाबासाहेबत आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचेकडून रद्द करण्यात आल्यामुळे व संस्थेत अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील सर्व वर्गात प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांचे स्थलांतरण विद्यापीठाने केल्यामुळे या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमास नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या मान्यतेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. असे संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ७/०४/२०२२ रोजीच्या तपासणी अहवालात नमुद करण्यात आले आहे.<br><br>वरील बाबींचा विचार करता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमास नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाने ज्या संस्थामध्ये स्थलांतरीत केलेले आहे. अशा संस्थाकडून या विद्यार्थ्यांचा प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव,स्वतंत्रपणे स्विकारुन तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी | सदर प्रकरणी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयास प्राधिकरणाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत दि.३१/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.<br><br>(J. P. Dange)<br>Chairman<br>Admissions Regulating Authority,<br>Maharashtra State |

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | पडताळणी करावी व तसे संबंधीत महाविद्यालयांना कळवावे, प्रस्तूत प्रकरणी सदरील पडताळणी झालेले प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाचा निर्णय घेण्यात येईल. या विद्यार्थ्यांचे प्रवेश मान्यता प्रस्ताव तपासणी अहवाल व प्रक्रिया शुल्का सहीत प्राप्त प्रस्ताव प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करावेत. | |
| ८. | १३/४/२०२२ विषय सूची क्रमांक १(४) | तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दिनांक ३१/०३/२०२२ रोजीच्या तपासणी अहवालानुसार संस्था कोड ४१७१ : प्रियदर्शनी इन्स्टिटयूट ऑफ इंजिनियरींग अॅण्ड टेक्नोलॉजी, नागपुर व ४१७९ : प्रियदर्शनी इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनियरींग, नागपुर या दोन संस्थांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ, नागपुर यांनी संस्था कोड ४१२३ : प्रियदर्शनी कॉलेज ऑफ इंजिनियरींग नागपुर या संस्थेत विलिन करण्यात आल्याचे नमूद केले आहे, त्यामुळे संस्था कोड क्रमांक ४१७१ व संस्था कोड ४१७९ या संस्थेत थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांना संस्था कोड ४१२३ या संस्थेत समजण्यात येऊन या सर्व तीन संस्थांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना संस्था कोड क्रमांक : ४१२३ या संस्थेत एकत्रित प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे. | संस्था कोड क्रमांक : ४१२३ या संस्थेस एकत्रित प्राधिकरणाचे दि.२८/०७/२०२२ रोजीचे मान्यतापत्र निर्गमित करण्यात आलेले आहे.<br><br>(J. P. Dange)<br>Chairman<br>Admissions Regulating Authority,<br>Maharashtra State |

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ९. | १८/०४/२०२२ विषय सूची क्रमांक १ | संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी सादर केलेल्या माहितीनुसार ०९ महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव अधिनियम २०१५ च्या तरतूदींनुसार विहित वेळेत सादर केलेले नाहीत. सबब सदर महाविद्यालयांनी रु. १ लाख दंड प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे भरणा करावा, संबंधीत महाविद्यालयांनी दंडाच्या रकमेचा भरणा केल्याची खातरजमा करुन संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी त्यांचे प्रवेश पडताळणी करावी. संबंधीत महाविद्यालयांकडून रितसर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणासमोर मान्यतेस सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. | एकुण ०९ महाविद्यालयांपैकी ०२ महाविद्यालयांनी प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे दंडाची पूर्तता केली असल्याने त्यांच्या प्रवेश पडताळणीबाबत संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना दिनांक २९/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| १०. | १२/०५/२०२२, १३/०५/२०२२ व २/०६/२०२२ | आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्राधिकरण स्तरावर १% प्रवेशांची पडताळणी | याबाबतचा सविस्तर अहवाल प्राधिकरणाच्या दिनांक २८/०७/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यतेकरिता सादर करण्यात आला असून सदरील अहवालाची नोंद घेण्यात आली आहे. |
| ११. | १२/०५/२०२२ विषय सूची क्रमांक २(क) | शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय, चंद्रपुर येथील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील व्यावसायिक विधी-३ वर्ष अभ्यासक्रमास प्रवेशित कु. शितल रविंद्र दुर्गे यांच्या प्रवेश मान्तयेबाबत. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधीतांना दिनांक ०३/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| १२. | १३/०५/२०२२ विषय सूची क्रमांक २(क) | विश्वनिकेतन कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आर्टस ॲण्ड डिझाईन, जिल्हा - रायगड येथील शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित कु. मंगेश राजन डेरवनकर यांच्या प्रवेश प्रकरणी. | प्राधिकरणाचा निर्णय २८/०७/२०२२ संबंधीतांना दिनांक रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.<br>(J. P. Dange)<br>Chairman<br>Admissions Regulating Author<br>Maharashtra State |
| १३. | १९/०५/२०२२ विषय सूची क्रमांक २(क) | थडोमल सहानी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित कु. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधीत महाविद्यालयास दि.१/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आला आहे. |

90921-

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
| --- | --- | --- | --- |
| | | अथर्व वामोरकर यांच्या शुल्क परताव्याबाबत | |
| १४. | २/०६/२०२२ विषय सूची क्रमांक १ | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील पदव्युत्तर एम.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित सर्व महाविद्यालयातील / विद्यार्थ्यांचे प्रवेश तपासणी / छाननी प्राधिकरण स्तरावर करण्याबाबत. | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील पदव्युत्तर एम.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित सर्व महाविद्यालयातील / विद्यार्थ्यांचे प्रवेश तपासणी / छाननी प्राधिकरण स्तरावर करण्यात आली असून, सदरील अहवालानुसार प्राधिकरणाच्या दिनांक २८/०७/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये (विषय सूची क्रमांक १(३) अनव्ये) संबंधीत महाविद्यालयाच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. |
| १५. | १४/०६/२०२२ विषय सूची क्रमांक २(क) | जगदंबा एज्युकेशन सोसायटीचे मातोश्री आसराबाई दराडे होमिओपॅथी मेडिकल कॉलेज, नाशिक येथील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी होमिओपॅथीक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी | १) प्राधिकरणाचे पत्र क्र.आशिप्र-१६२०/प्र.क्र.३१/ प्रनिप्रा/१४१४ दिनांक २३/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संबंधित महाविद्यालयास निर्णय/निर्देश कळविण्यात आला.<br>२)सदर महाविद्यालयाचे जावक क्र. JES/ BHMS/ Students/३१/ARA/२४६/२०२२-२३, दिनांक २८/६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदर महाविद्यालयामार्फत दंडाची प्रतिपुर्तता करण्यात आली आहे. |
| १६. | १४/०६/२०२२, १५/०६/२०२२, १६/०६/२०२२ व १७/०६/२०२२ | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १) Hilly Area, २) PWD, ३) Defense, ४) MKB व ५) Orphan या संवर्गातून प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणीबाबत | याबाबतचा सविस्तर अहवाल प्राधिकरणाच्या दिनांक २८/०७/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यतेकरिता सादर करण्यात आला असून सदरील अहवालाची नोंद घेण्यात आली आहे. |
| १७. | २२/०६/२०२२, २३/०६/२०२२ व २४/०६/२०२२ | १(४) : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी आयुर्वेद व होमिओपॅथी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १) Hilly Area, २) PWD, ३) Defense व ४) Orphan या संवर्गातून प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी | प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये सदरील अहवालाची नोंद घेण्यात आली.<br>(J. P. Dange)<br>Chairman<br>Admissions Regulating Authority,<br>Maharashtra State |
| | | १(५) : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी | प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये सदरील अहवालाची नोंद घेण्यात |

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | आयुर्वेद व होमिओपॅथी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरण स्तरावर १% प्रवेशांची पडताळणी | आली. |
| १८. | २८/०७/२०२२ विषय सूची क्रमांक २(च) | प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा या दोनही विभागांच्या दैनंदिन कामकाजाचे नियमन करण्यासाठी "विनियम" तयार करण्याबाबत | प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक ८/०९/२०२२ व ११/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास कळविण्यात आलेले आहे. |
| १९. | २९/७/२०२२ विषय सूची क्रमांक २(क) | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि. १५, १६ व १७ जुन, २०२२ रोजींच्या बैठकीत महाविद्यालयांनी विहीत केलेल्या कालावधीमध्ये प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव प्राधिकरणाकडे सादर न केल्यामुळे अशा महाविद्यालयांना प्रत्येकी रु.१ लाख दंड आकारण्यात आलेला होता. यासंदर्भात काही महाविद्यालयांकडून प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्यास जाणिव पुर्वक विलंब न झाल्याची निवेदने प्राधिकरणांस सादर केलेली आहेत. संबंधीत संचालकांनी प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव तपासणी करुन प्राप्त झाल्यानंतर त्वरीत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे असे प्रस्ताव सादर केल्याचे महाविद्यालयांनी त्यांच्या निवेदनामध्ये सादर केलेले आहे. अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतुदींनुसार या महाविद्यालयांनी जाणिव पुर्वक दिरंगाई केल्याचे दिसून येत नाही सबब, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि. १५, १६ व १७ जुन, २०२२ रोजींच्या बैठकीत महाविद्यालयांना प्रत्येकी रु. १ लाखाची दंडात्मक कारवाई २६ | सदर निर्णयाच्या अनुषंगाने, संबंधीत महाविद्यालयांना प्रवेश मान्यतेची पत्रे निर्गमित करण्यात आलेले आहे.<br><br>(J. P. Dange)<br>Chairman<br>Admissions Regulating Authority,<br>Maharashtra State |

१०२५

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | करण्यात येत आहे.<br>प्राधिकरण पुढे असे आदेश देत आहे की, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि. १५, १६ व १७ जुन, २०२२ रोजींच्या बैठकीतील प्रपत्र अ नुसार मान्यता दिलेल्या प्रवेशांना विहीत पद्धतीनुसार प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करावी. | |
| २०. | २९/७/२०२२ विषय सूची क्रमांक २(ग) | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.११ एप्रिल २०२२ च्या बैठकीतील बाब क्र.१ मधील परिच्छेद क्र.५ (प्रपत्र - ई) व दि. १२ एप्रिल, २०२२ च्या बैठकीतील बाब क्र. १ मधील परिच्छेद क्र.६ (प्रपत्र - ड) मध्ये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या तपासणी अहवालात काही विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेसाठी शिफारस केली नव्हती, परंतू त्रुटी दर्शविण्यात आली नाही व काही विद्यार्थ्यांचे प्रवेश मान्यतेसाठी शिफारस होती परंतू त्यांच्या नावासमोर प्रवेश रद्द असा शेरा होता असे सर्व प्रवेश १% प्रवेश पडताळणी समितीने पुन:श्च पडताळणी करुन त्याचा अहवाल त्वरीत प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले होते, त्यानुसार उक्त प्रवेश पडताळणी समितीने सादर केलेल्या अहवालास प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे.<br>सदर अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, प्राधिकरणाच्या दि.११ व १२ एप्रिल, २०२२ रोजीच्या बैठकीतील प्रपत्र क मधील महाविद्यालयांची माहिती खालीलप्रमाणे आहे. | उपसमितीच्या पडताळणी अहवालास प्राधिकरणाच्या दि.२९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. सदर अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने संबंधीत महाविद्यालयांना मान्यता पत्रे निर्गमित करण्यात आलेली आहेत.<br><br>(J. P. Dange)<br>Chairman<br>Admissions Regulating Authority,<br>Maharashtra State |

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
| --- | --- | --- | --- |
| २१. | दि.२९/७/२०२२ विषय सूची क्रमांक २(घ) | महाराष्ट्र शासनाच्या दि.२२/०१/२०२० रोजीच्या पत्रात विद्यापीठ संचलित व विद्यापीठ विभाग महाविद्यालयांचा प्रवेश मान्यतेबाबत उल्लेख केलेला नाही त्यामुळे विद्यापीठ संचलित व विद्यापीठ विभाग महाविद्यालयांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांना प्राधिकरणाची मान्यता घेणे क्रमप्राप्त असल्याचे प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.११/०४/२०२२ रोजीच्या बैठकीत निर्देश देण्यात आलेले आहे. याबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.२७/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत महाविद्यालयांना अवगत करण्यात आले होते. त्यानुसार विद्यापीठ संचलित व विद्यापीठ विभाग महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या तपासणी अहवाल व प्राधिकरणाच्या प्रक्रिया शुल्कासह सादर केले आहेत अशा प्रस्तावांना संचालनालयाच्या तपासणी अहवालानुसार ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी नाहित अशा प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे. (प्रपत्र - ई ) मान्यता दिलेल्या प्रवेशांना विहीत पद्धतीनुसार महाविद्यालयांना प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करावी. | संबंधीत महाविद्यालयांना प्रवेश मान्यतेची पत्रे निर्गमित करण्यात आलेली आहेत.<br>(J. M. Dange)<br>Chairman<br>Admissions Regulating Authority,<br>Maharashtra State |
| २२. | २९/७/२०२२ विषय सूची क्रमांक २(ङ) | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. २ (झ) | उक्त निर्णयाच्या अनुषंगाने विहित कालावधीत प्रकरणांचा निपटारा होण्यासाठी संबंधीत संचालकांकडून अहवाल सादर करण्याबाबत |

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | मधील निर्णयानुसार व तद्नुषंगाने प्राधिकरणाच्या दि.१/१०/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार हितसंबधीत (महाविद्यालये/विद्यार्थी) घटकांनी सादर केलेल्या पुन:र्विलोकन याचिकांबाबत मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सुनावणी घेऊन संबंधीतांना सुनावणीचे निर्णय निर्गमित करण्यात आले. सदर निर्णयाबाबत ब-याच महाविद्यालयांकडून पुन:र्विलोकन याचिकेतील विनंतीचा पुन:र्विचार करण्याबाबत निवेदने सादर केलेली आहेत (प्रपत्र - उ). सादर करण्यात आलेली निवेदने व तसेच उक्त प्रकरणी सादर करण्यात येणा-या निवेदनांप्रकरणी अधिनियम २०१५ मधील तरतुदीं, प्रवेश नियम, मा. न्यायालयांचे निर्णयानुसार अशा निवेदनांबाबत उक्त प्रकरणी महाविद्यालयांनी सादर केलेली कागदपत्रे तपासून आवश्यक त्या शिफारशीसह सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सविस्तर प्रकरणनिहाय अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करावा. | प्राधिकरणाच्या दिनांक १७/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |

******

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २१/०३/२०२२ ते २९/०७/२०२२ या कालावधीमध्ये झालेल्या बैठकीतील इतिवृत्तानुसार सीईटी कक्षाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा (Action Taken Report) अहवाल खालीलप्रमाणे,-

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संदर्भात झालेल्या विषयांबाबतचा अहवाल

| अ. क्र. | बैठक दिनांक | प्रवेश नियामक प्राधिकरणाचा निर्णय | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | २१/०३/२०२२ विषय क्र.२ | **(ख) - नव्याने मान्यता प्राप्त भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी मेडिकल कॉलेज, पुणे या विनाअनुदानित संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विद्यार्थी प्रवेशाबाबत**<br>शैक्षणिक वर्ष २०२१२२ मधील व्यावसायिक पदवी वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी मेडिकल कॉलेज, पुणे या नव्याने मान्यता प्राप्त महाविद्यालयास संबंधीत प्राधिकरणांची मान्यता प्राप्त झालेली आहे, परंतु महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे संलग्नीकरण अद्याप प्राप्त झालेले नाही. या संदर्भात संबंधीत महाविद्यालयाच्या प्रवेश प्रकरणी इच्छुक उमेदवारांकडून पसंतीअर्ज भरुन घेण्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान केली आहे. | प्राधिकरणाच्या मान्यतेनुसार सूचना क्र. २३ दिनांक १७/०३/२०२२ नुसार नव्याने मान्यता प्राप्त भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी मेडिकल कॉलेज, पुणे या महाविद्यालयाचे उमेदवारांकडून दिनांक १९/०३/२०२२ ते दिनांक २२/०३/२०२२ या कालावधीत ऑनलाईन पसंतीक्रम भरुन घेण्यात आले. |
| २ | २१/०३/२०२२ विषय क्र.२ | (घ) – शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेकरीता नोंदणी केलेल्या परंतू प्रत्यक्षात परीक्षेस न बसलेल्या व केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी न झालेल्या उमेदवारांच्या संख्येबाबत संबंधित सेवा पुरवठादारांना देण्यात येणाऱ्या देयकातील दराच्या ५० टक्के रक्कम आवश्यक ती तपासणी/छाननी करुन अदा करण्याचे निर्देश देण्यात आले | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून सामाईक प्रवेश परीक्षांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या सेवापूरवठादारा-कडून वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सामाईक प्रवेश परीक्षा वगळून इतर सर्व सामाईक प्रवेश परीक्षा समाधानकारक रीत्या पुर्ण केल्या आहेत. त्यानुसार सामंजस्य करारामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती नुसार टप्प्यानुसार सादर करण्यात आलेली देयके पारीत करण्यात आली आहेत. |
| ३ | ०७/०४/२०२२ | **प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही विभागातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीबाबत.**<br>प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यां दोन्ही विभागातील निव्वळ कंत्राटी तत्वावरील कार्यरत गट - क व गट - ड संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्तेबाबत भोसले समितीच्या अहवालास अनुसरुन प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/१२/२०२१ रोजीच्या बैठकीतील विषय क्र. ४ मधील अ.क्र.१ नुसार माहे एप्रिल, २०२२ पासून ५ टक्के दराने वेतन वाढ करण्याचा तसेच ११ महिन्यांकरिता नियुक्तीस मुदतवाढ देण्याचा प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे. | राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या दिनांक १२/०४/२०२२ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये निव्वळ कंत्राटी तत्वावरील कार्यरत गट - क व गट - ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना ५ टक्के वेतन वाढ देऊन ११ महिन्यांकरिता नियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.<br>तसेच भोसले समितीकडून कंत्राटी कर्मचारी यांची वेतनवाढ ही दर वर्षी ५ ते १० टक्के करणेबाबत सुधारित अहवाल दिनांक ०९/०५/२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. |
| ४ | १३/०४/२०२२ विषय क्र.२ | **(ख) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक**<br>आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्रायोगिक तत्वावर सादर केलेल्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकियेकरीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षांचे वेळापत्रकाची नोंद घेण्यात आली. सदरील वेळापत्रकामध्ये बदल झाल्यास त्याबाबतची माहिती प्राधिकरणास अवगत करण्याचे निर्देश देण्यात आले. | जी मेन आणि जी ॲडव्हान्स या परीक्षांमुळे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात येणाऱ्या सामाईक परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या होत्या. त्यानुसार नवीन वेळापत्रकानुसार सामाईक परीक्षा राबविण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत सर्व सामाईक परीक्षा यशस्वीरीत्या पुर्ण झाल्या आहेत.<br>तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाची सामाईक परीक्षा दिनांक ०६/११/२०२२ रोजी घेण्याचे नियोजित केले आहे. |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

१०२५१-

| अ. क्र. | बैठक दिनांक | प्रवेश नियामक प्राधिकरणाचा निर्णय | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ५ | १८/०४/२०२२ विषय क्र.२ | **(क)** शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी घेण्यात आलेल्या सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात प्राधिकरणाच्या निर्णयानुसार गठित करण्यात आलेल्या भोसले समितीतील अहवालामध्ये शिफारस केल्यानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कार्यरत सर्व अधिकारी/कर्मचारी यांना मानधन अदा करण्याबाबत प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. याबाबतचा खर्च दोन्ही विभागांच्या स्वतंत्र लेख्यामधून करण्यात यावा. | प्राधिकरणाच्या मान्यतेनुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या दिनांक १३/०४/२०२२ रोजीच्या मंजूर आदेशानुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कार्यरत सर्व अधिकारी/कर्मचारी यांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या खात्यामधून मानधन अदा करण्यात आले आहे. |
| ६ | १९/०४/२०२२ विषय क्र.२ | **(क)** सीईटी कक्षातील कला शिक्षण विभागातील कामकाजाकरीता संचालनालय, कला शिक्षण, मुंबई येथे निव्वळ कंत्राटी तत्वावर कार्यरत श्री.पंकज पाटील, लिपिक - टंकलेखक यांच्या कंत्राटी तत्वावरील नेमणूकीस रु.१५०००/- मासिक मानधन अदा करण्याच्या अटींवर दिनांक ०१/०४/२०२२ पासून मान्यता देण्यात येत आहे.<br>**(ख)** राज्य सामाईक प्रवेश परीक्षाकरीता श्रीमती रेखा रेडेकर, सफाईगार व श्रीमती माया गोडे, सफाईगार यांची निव्वळ कंत्राटी तत्वावर रु.१२०००/- मासिक मानधन निश्चितीवर नेमणूक करण्यास दिनांक ०४/०३/२०२२ पासून प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे.<br>**(ग)** प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई येथील निव्वळ कंत्राटी तत्वावरील कार्यरत श्रीमती भारती, विधी सहाय्यक यांना दरमहा रु.२५०००/- एवढया ठोक मासिक मानधन निश्चितीवर नेमणूक करण्यास दिनांक १७/०३/२०२२ पासून प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे.<br>वरीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची ११ महिन्यांकरीता किंवा पुढील आदेश होईपर्यंत, या पैकी जे अगोदर होईल त्यानुसार नियुक्ती करण्याबाबत सुधारित आदेश मा.अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांना सादर करावेत, प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष कार्यालयातील रिक्त पदे भरण्याकरीता सेवापुरवठादार यांनी नेमणूक करण्याबाबत उचित कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले. उपरोक्त तात्पुरती कंत्राटी पध्दतीने भरण्यात आलेली पदे सेवा पुरवठादारांची नेमणूक होईपर्यंत करण्यात येत आहेत, तद्नंतर अशी पदे सेवापूरवठादारामार्फत भरण्यात येतील.<br><br>**(घ)** प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कंत्राटी तत्वावरील गट - क व गट - ड संवर्गातील कंत्राटी तत्वावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती, सेवा व शर्ती संबंधीत मा.प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/१२/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र.४(२) मधील निर्णयानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीने त्वरीत कार्यवाही करुन त्याचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा. याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी आवश्यकतेनुसार कार्यालयीन आदेश निर्गमित करण्याचे निर्देश देण्यात येत आहे. | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १९/०४/२०२२ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त दिनांक २०/०५/२०२२ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.<br>त्यामुळे (क), (ख) आणि (ग) बाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या मान्यतेनुसार माहे जून, २०२२ पासून प्राधिकरणाने नेमूण दिलेले मासिक मानधन अदा करण्यात येत आहे.<br><br>**(घ)** बाबत प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कंत्राटी तत्वावरील गट - क व गट - ड संवर्गातील कंत्राटी तत्वावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती, सेवा व शर्ती तयार करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीस सेवा व शर्ती प्रवेश नियामक प्राधिकरणास पाठविण्यासाठी दिनांक २८/०१/२०२२ रोजी पत्र पाठविण्यात आले आहे. |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

| अ. क्र. | बैठक दिनांक | प्रवेश नियामक प्राधिकरणाचा निर्णय | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ७ | १८/०५/२०२२ विषय क्र.२ | **(क) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामध्ये निव्वळ कंत्राटी तत्वावर नव्याने नियुक्ती करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांबाबत**<br>राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कंत्राटी तत्वावर कार्यरत श्री.अनिल दादा आहेर, शिपाई दिनांक २३/०९/२०२१ रोजी पासून विनावेतन अनुपस्थित असल्याने, त्यांचे जागी श्री.नागेश दत्तात्रय नुपनारायण यांची शिपाई पदावर तसेच श्री.राजेश सदाशीव जाधव यांची जन संपर्क अधिकारी या पदावर निव्वळ कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत सीईटी कक्षाने सादर केलेल्या दिनांक १८/०५/२०२२ रोजीच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.<br>वरीलप्रमाणे कर्मचाऱ्यांना ११ महिन्यांकरीता किंवा पुढील आदेश होईपर्यंत, यापैकी जे अगोदर होईल त्यानुसार नियुक्ती करण्याबाबत आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करावी. | मा.मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांनी मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण तथा पालकमंत्री सिंधुदूर्ग जिल्हा यांचे मंत्रालयीन कामकाजाकरीता कंत्राटी पध्दतीने श्री.नागेश नुपनारायण यांची शिपाई या पदावर ११ महिन्याकरीता नियुक्ती करण्यात आली होती.<br>परंतु मंत्रीमंडळ बरखास्त होऊन २ महिन्याचा कालावधी होऊन सुध्दा त्यांनी कार्यालयाशी संपर्क केला नसल्यामुळे तसेच त्यांनी माहे जून आणि जुलै या दोन महिन्याचा उपिस्थिती अहवाल कार्यालयास सादर न केल्यामुळे त्यांच्या सेवा दिनांक ०१/०८/२०२२ पासून समाप्त करण्यात आल्या आहेत.<br>त्याचप्रमाणे श्री. राजेश जाधव हे जन संपर्क अधिकारी या पदाची पात्रता पुर्ण करत नसल्यामुळे त्यांची नियुक्ती करण्यात आली नव्हती. |
| ८ | ०२/०६/२०२२ विषय क्र.२ | **(क)** – मा.मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शिफारशीनुसार श्री.राहुल शिंदे यांची शिपाई पदावर ११ महिन्यांकरीता निव्वळ कंत्राटी तत्वावर राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामध्ये नियुक्ती करण्याबाबत प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.<br><br>**(ख)** – प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १८/०५/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र.२(क) मधील निर्णयानुसार श्री.राजेश सदाशिव जाधव यांची जन संपर्क अधिकारी या पदावर निव्वळ कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत सीईटी कक्षाने सादर केलेल्या दिनांक १८/०५/२०२२ रोजीच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली होती, सबब सदरील निर्णय तहकूब करण्यात येत असून या संदर्भात आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी याबाबत उचित कार्यवाही त्वरीत करावी. | मा.मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांनी मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण तथा पालकमंत्री सिंधुदूर्ग जिल्हा यांचे मंत्रालयीन कामकाजाकरीता कंत्राटी पध्दतीने श्री.राहुल शिंदे यांची शिपाई या पदावर ११ महिन्याकरीता नियुक्ती करण्यात आली होती.<br>परंतु मंत्रीमंडळ बरखास्त होऊन २ महिन्याचा कालावधी होऊन सुध्दा त्यांनी कार्यालयाशी संपर्क केला नसल्यामुळे तसेच त्यांनी माहे जून आणि जुलै या दोन महिन्याचा उपिस्थिती अहवाल कार्यालयास सादर न केल्यामुळे त्यांच्या सेवा दिनांक ०१/०८/२०२२ पासून समाप्त करण्यात आल्या आहेत.<br><br>श्री.राजेश जाधव यांचे जनसंपर्क अधिकारी पदाचे कार्यालयीन आदेश निर्गमित केले नसल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. |
| ९ | २३/०६/२०२२ विषय क्र.२ | **(क) – प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा याकरिता वकिलांचे पटल (Panel) तयार करण्याबाबत.**<br>माहे जुलै २०२२ पासून प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोनही विभागांशी संबंधीत न्यायालयाच्या विविध खंडपीठामध्ये न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याकरिता वकिलांचे पटल तयार करण्याचे प्राधिकरणाचे विचाराधीन होते.<br>या संदर्भात दिनांक २०/०७/२०२१ रोजीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात | (क) नुसार मा उच्च न्यायालयाच्या मुंबई, नागपुर व औरंगाबाद खंडपीठामध्ये नियुक्त करण्यात आलेल्या एकुण २९ वकीलांना दिनांक १९/०९/२०२२ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले होते. तसेच सदर आदेशामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्यास पुढील सात |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

| अ. क्र. | बैठक दिनांक | प्रवेश नियामक प्राधिकरणाचा निर्णय | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | आली होती व तद्नुषंगाने एकुण ५५ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले संबंधीत इच्छुक उमेदवाराची दिनांक १६/०६/२०२२ ते १७/०६/२०२२ या कालावधीमध्ये मा. अध्यक्ष प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी मुलाखती घेतल्या आहेत. प्रस्तुत प्रकरणी सांगोपांग चर्चा करून खालील प्रमाणे निर्देश/निर्णय घेण्यात आले.<br>१) प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष दोनही विभागांशी संबंधीत न्यायालयाच्या विविध न्यायालयीन प्रकरणी दिनांक २०/०७/२०२१ रोजी जाहिर सुचनेच्या अनुषंगाने मुलाखतीस उपस्थित झालेल्या उमेदवारांनी सादर केलेली कागदपत्रे व त्यानुसार घेण्यात आलेल्या मुलाखतीस अनुसरुन उपस्थित सर्व उमेदवारांची माहे जुलै २०२२ पासून प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोनही विभागांशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याकरिता वकिलांच्या पटलावर नियुक्ती करण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला.<br>२) मा उच्च न्यायालयाच्या मुंबई, नागपुर व औरंगाबाद खंडपीठामध्ये प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोनही विभागांशी संबंधीत न्यायालयीन पटलावरील सर्व वकिलांना क्रमाक्रमाने प्रकरणे देण्यात यावी.<br>३) पटलावरील सर्व वकिलाना शासनाने विहित केलेल्या नियमांनुसार व शासकीय दराप्रमाणे व्यावसायिक शुल्क अदा करण्यात येईल.<br>४) तसेच नविन वकिलांची नियुक्ती करण्यात आली असल्याने यापूर्वी वकिलांचे स्थापित करण्यात आलेले पटल बरखास्त करण्याचा निर्णय घेण्यात आला.<br>याप्रमाणे संबंधीतांनी पुढील कार्यवाही करावी. | दिवसांत कार्यालयास कळविण्यात यावे, त्यानंतरच आपली या कार्यालयाच्या वकील पटलावरील नियुक्ती ग्राह्य धरण्यात येईल, असे नमुद केले होते.<br>त्यानुसार १५ वकीलांनी सात दिवसाच्या आत अटी व शर्ती मान्य केल्या होत्या त्यांना प्राधान्य देण्यात आले आहे.<br>त्याचप्रमाणे सध्याचे पॅनल वरील वकील दिनांक १९/०९/२०२२ रोजीच्या आदेशात नमुद केलेल्या प्रति न्यायालयीन प्रकरणाच्या संदर्भात देण्यात येणाऱ्या शुल्क रक्कमेबाबत समाधानी नाहीत त्यांनी मागील वर्षाप्रमाणे प्रति न्यायालयीन प्रकरणाची शुल्क रक्कम मागणी केली आहे.<br>त्यानुसार ज्या वकीलांनी अटी व शर्ती मान्य केल्या आहेत अशा वकीलांनाच प्रवेश नियामक प्राधिकरण आणि राज्य सीईटी कक्षाची प्रकरणे देण्यात येत आहेत. |
| | | **(ख) डॉ. एस. के महाजन यांची सेवा प्राधिकरण व सीईटी कक्षामध्ये पुढील दोन वर्षांकरिता करण्याबाबत.**<br>डॉ. एस. के. महाजन, परीक्षा समन्वयक तंत्रशिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष तथा अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण हे नियमित वयोमानानुसार दिनांक ३०/०६/२०२२ रोजी सेवा निवृत्त होणार आहेत. तथापि या संदर्भात सीईटी कक्षाने दिनांक २२/०६/२०२२ रोजी सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले असता डॉ. एस. के. महाजन यांच्या शासकीय सेवेतील प्रदीर्घ कालावधी व अनुभव पाहता तसेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे कामकाज प्रगतीपथावर आहे व तद्नुषंगाने अतिमहत्वाच्या व गोपनीय कामकाजाकरिता अनुभवी व जवाबदार अधिकारी असणे आवश्यक आहे ही बाब लक्षात घेऊन डॉ. एस. के. महाजन यांना प्राधिकरण व सीईटी कक्षामध्ये पुढील दोन वर्षांकरिता परीक्षा समन्वयक, तंत्र शिक्षण विभाग, तथा विशेष कार्य अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई आणि अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण या पदावर नियुक्ती करण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे. डॉ. महाजन यांना शासकीय नियमानुसार अनुज्ञेय असलेले इतर भते तथा वेतन वजा निवृत्ती वेतन या पध्दतीने मासिक वेतन/मानधन अदा करण्यात येईल.<br>याप्रमाणे संबंधीतांनी पुढील कार्यवाही करावी. | श्री.राजेंद्र लोंढे यांची उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक २६/०७/२०२२ अन्वये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामध्ये परीक्षा समन्वयक या पदावर नियुक्ती केल्यामुळे डॉ.एस.के. महाजन यांची सेवा प्राधिकरण व सीईटी कक्षामध्ये उपलब्ध करुन घेण्यात आल्या नाहीत.<br><br>(J. P. Dange)<br>Chairman<br>Admissions Regulating Authority,<br>Maharashtra State |

| अ. क्र. | बैठक दिनांक | प्रवेश नियामक प्राधिकरणाचा निर्णय | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | **(ग) प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोनही विभागांकरिता वाहने खरेदी करण्याबाबत**<br>याबाबत बैठकीमध्ये चर्चा झाली, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याकरिता वाहन खरेदी बाबत आर्थिक बोजासह सविस्तर प्रस्ताव प्राधिकरणास सादर करावा. तद्नंतर प्रवेश नियामक प्राधिकरण यथावकाश कार्यवाही करेल. | प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सीईटी कक्ष या दोनही विभागांकरीता वाहने खरीदी करण्याबाबत दिनांक २८/१०/२०२२ रोजीच्या बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात येईल. |
| १० | २८/०७/२०२२ विषय क्र.२ | **(क) - डॉ. एस. के. महाजन, (से.नि.) परीक्षा समन्वयक, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या नियुक्तीबाबत.**<br>प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २३/०६/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. (ख) नुसार डॉ. एस. के. महाजन यांच्या नियत वयोमानुसार सेवा निवृत्ती नंतर राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयामध्ये नियुक्ती बाबत निर्णय घेण्यात आलेला होता, तथापि उच्च व तंत्र शिक्षणविभाग, मंत्रालय, मुंबई येथील क्रमांक प्रतिनि- २०२२/प्र.क्र.१२/२२/तांशि-१, दिनांक २६/०७/२०२२ अन्वये श्री. राजेंद्र लक्ष्मण लोंढे यांची राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामध्ये परीक्षा समन्वयक या पदावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने प्राधिकरणाचा दिनांक २३/०६/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. २ (ख) रद्द करण्यात येत आहे. | डॉ.एस.के.महाजन, (से.नि.) परीक्षा समन्वयक, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित केले नसल्यामुळे याबाबत प्रश्न उद्भवत नाही. |
| | | **(ग) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील उच्च शिक्षण विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता राज्य सीईटी कक्षाकडून घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षांकरिता DLO/DO नियुक्तीबाबत.**<br>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील उच्च शिक्षण विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकरिता DLO/DO नियुक्तीबाबत सीईटी कक्षाने सादर केलेल्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. संबंधीत अधिकाऱ्यांना श्री. भोसले समितीने सादर केलेल्या अहवालानुसार प्राधिकरणाच्या बैठकीतील निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेल्या दरानुसार संबंधीताना मानधन अनुज्ञेय असतील. याची नोंद घ्यावी. | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये सामाईक प्रवेश परीक्षेकरीता नियुक्त करण्यात आलेल्या DLO/DO यांची देयके प्राप्त झाल्यावर संबंधितांना भोसले समितीने सादर केलेल्या अहवालनुसार मानधन अदा करण्यात येईल. |
| | | **(घ) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी कला अभ्यासक्रमांच्या राज्य स्तरीय कोटयाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सेवापुरवठादार निश्चितीबाबत**<br>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी कला अभ्यासक्रमांच्या राज्य स्तरीय केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सेवापुरवठादार निश्चिती संदर्भात राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सादर केलेल्या दिनांक १३/०७/२०२२ रोजीच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी कला अभ्यासक्रमांच्या राज्य स्तरीय कोटयाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेरीता मे.एस.एम.बी. या सेवापूरवठादाराची नियुक्ती करण्यात आली असून केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे सूरु आहे. |
| | | **(ङ) श्री. तुषार यशवंत शिंदे, कार्यासन अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या नियुक्तीबाबत**<br>श्री. तुषार यशवंत शिंदे, कार्यासन अधिकारी, संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील | श्री.तुषार य. शिंदे, कार्यासन अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना पत्र पाठविण्यात आले आहे. |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority
Maharashtra State

१०२९/

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>बैठक दिनांक</th><th>प्रवेश नियामक प्राधिकरणाचा निर्णय</th><th>केलेली कार्यवाही</th></tr>
<tr><td></td><td></td><td>प्रतिनियुक्तीच्या संचात प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचा कार्यमुक्ती अहवाल प्राप्त करून त्यानंतर त्याची नेमणूक प्रवेश नियामक प्राधिकरणामध्ये कक्ष अधिकारी म्हणून करण्यात यावी.<br><br>(च) प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा या दोनही विभागांच्या दैनंदिन कामकाजाचे नियमन करण्यासाठी विनियम तयार करण्यात<br>प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २५/१०/२०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार अधिनियम २०१५ मधील तरतूदीची अंमलबजावणी करण्यासाठी प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षासाठी संबंधीत कायदेशीर तरतूदींबाबत विनियम अद्याप तयार झालेले नाहीत आणि त्यासाठी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी याबाबत तात्काळ कार्यवाही करावी.<br><br>छ) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा.</td><td><br><br><br><br>मंजूर ठरावानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>११</td><td>२९/०७/२०२२<br>विषय क्र.२</td><td>(क) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये आयुक्त तथा प्राधिकारी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे राबविण्यात येणा-या वैद्यकीय, आयुष, तंत्र, कला, कृषि व उच्चशिक्षण पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेकरीता सेवा पुरवठादार निश्चितीबाबत.<br>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या विविध विभागाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नेमण्यात आलेल्या सेवापुरवठादारां मार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरीतपणे पार पडली आहे. त्यानुषंगाने, आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विविध अभ्यासक्रमांच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया गतवर्षीच्या सेवापुरवठादारामार्फत राबविण्यासाठी गतवर्षी प्रसिद्ध केलेल्या निविदा RFP Proposal मधील मुद्दा क्र. ४.२ (सी) मधील तरतुदीनुसार गतवर्षीच्या अटी/शर्ती व खालील तक्त्यात नमूद केलेल्या दरांनुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत शिफारस केली.<br>
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विभागाचे नाम</th><th>सेवा पूरवठादार</th></tr>
<tr><td rowspan="2">१)</td><td rowspan="2">तंत्रशिक्षण</td><td>मे.फोर पिलर्स प्रा.लि.</td></tr>
<tr><td>मे.सिथेसिस प्रा.लि.</td></tr>
<tr><td>२)</td><td>उच्चशिक्षण</td><td>मे.तलिस्मा कार्पोरेशन</td></tr>
</table>
</td><td>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे राबविण्यात येणाऱ्या वैद्यकीय, आयुष, तंत्र, कला, कृषि व उच्च शिक्षण पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेकरीता सेवापूरवठादारांची नियुक्ती करण्यात आली असून संबंधित सेवापूरवठादारांसोबत सामंजस्य करण्यात आला आहे.<br><br>(J. P. Dange)<br>Chairman<br>Admissions Regulating Authority,<br>Maharashtra State</td></tr>
</table>

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>बैठक दिनांक</th><th>प्रवेश नियामक प्राधिकरणाचा निर्णय</th><th>केलेली कार्यवाही</th></tr>
<tr><td></td><td></td><td>
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विभागाचे नाम</th><th>सेवा पुरवठादारे</th><th></th></tr>
<tr><td>३)</td><td>कृषिशिक्षण</td><td>मे.एस.एम.बी.सिस्टम</td><td>३६०/-</td></tr>
<tr><td>४)</td><td>वैद्यकीय व आयुष</td><td>मे.एस.एम.बी.सिस्टम</td><td>२४०/-</td></tr>
<tr><td>५)</td><td>कलाशिक्षण</td><td>मे.एस.एम.बी.सिस्टम</td><td>३००/-</td></tr>
</table>
आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी शिफारसीमध्ये नमूद केलेल्या दरावरील सेवापुरवठादाराच्या नेमणुकीस प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे. सदर कामाबाबत पुरवठादारासोबत सामंजस्य करार करून त्याची प्रत मा.सदस्य, प्रवेश नियामक प्राधिकरण यांना माहितीसाठी पाठविण्यात यावी. याबाबत आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी पुढील कार्यवाही करावी
</td><td></td></tr>
</table>

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State.